## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ३४५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०७/०७/२०१८

**१) लाचलुचपत विभागाची कार्यवाही :-**

दिनांक ०६/०७/०१८ चे ११.१० वाजता दरम्यान यातील आरोपी यांनी तक्रारदार सुनिल बनकर याना त्यांनी ग्रामपंचायत कार्यालय अंतर्गत एकुण ०६ नवीन हातपंपाचे खोदकामाचे व १ नादुरूस्त खोदकामाचे एकुण ७,९२,०१६/रु. बिलाचे चेक स्वाक्षरी करून चेक देण्याकरीता पडताडळणी कार्यवेळी ३२,०००/रु. लाचेची मागणी करून प्रत्यक्ष सापळा कार्यवाही वेळी कोणत्याही प्रकारचा प्रतिकार न करता ३२,०००/रु. ची लाच रक्कम स्विकारल्या वरून सरतर्फे फिर्यादी पोलीस निरीक्षक पारधी लाचलुचपत प्रतिबंध विभाग भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ७,१३(१),(ड), १३(२) जा.प्र.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलीस निरीक्षक पारधी लाचलुचपत प्रतिबंध विभाग भंडारा पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) शेतातील पाणी जाण्याच्या कारणा वरून भांडण करून फावडयाने डोक्यावर मारून जखमी करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक ०६/०७/०१८ चे ०९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी जखमी हिच्या धानाचे परे असलेल्या शेतात पाणी भरलेला असल्याने धानाचे परे खराब होवु नये म्हणुन तिने तिचे धुऱ्याची खांड पाणी वाहुन जाण्याकरीता फोडली असता,शेजारी असलेला शेतकरी आरोपी याने 'माझ्या शेतात पाणी कसा सोडली तुझ्या शेतातील पाणी माझ्या शेतात पाहीजे नाही' म्हणुन फिर्यादी सोबत भांडण करून शिवीगाळ केली व हातातील फावडयाने फिर्यादीचे डोक्यावर मारून जखमी करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी सौ. सुरेखा धनराज वैदय वय ४५ वर्ष रा. बेलघाटा यांचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. कळपते पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलच्या धडकेत पायी जाणारा इसम जखमी :-**

दिनांक ०५/०७/०१८ चे २०.०० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी हा नवेगाव बांध रोड येथे लघुवीधी करून गजानन बाबा मंदीर सानगडी कडे पायदळ जात असतांनी यातील आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन जखमी किल्याने फिर्यादी जखमी नितीन आनंदराव खंडाईत वय ४७ वर्ष रा. सानगडी यांचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) इसमाचा मृत्यु: -**

दिनांक ०५/०७/२०१८ चे १८.३० वाजता दरम्यान यातील मृतक श्रीराम वासुदेव राघोर्ते वय ५५ वर्ष रा. शास्त्री वार्ड तुमसर हा त्याचे घरून बाहेर जाणे कामी त्याची स्वत:ची मोटार सायकल क्र. एमएच ३६ ए सी १३४२ टीव्हीएस ज्युपीटर ही घराच्या वरांडयातुन काडीत असतांना घराचे वाल कंपाऊडच्या आत गाडीसह घसरून खाली पडल्याने त्याच्या डोंक्याला मार लागल्याने त्यांना फिर्यादी व मृतकची मुलीसह सु.बो. दवाखाना तुमसर यथे नेले असता वैदयकीय अधिकारी यांनी तपासणी करून मृत अवस्थेत असल्याचे सागींतल्याने फिर्यादी चेतन श्रीराम राघोते वय २३ वर्ष रा. शास्त्री वार्ड तुमसर यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुसर येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चिचखेडे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

५) अवैध देशी दारू /जुगार अडड्यांवर धाडी . :–

दिनांक ०६/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन कारधा, व साकोली येथे अवैध देशी दारू/जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०१ लिटर ९८० मिलीलीटर देशी दारू किमती ५७२/रु. तसेच जुगारातुन किमती ४,०७९/रु असा एकुण किंमती ४,६५१/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०६/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२ तीन सिटर वाहनाकरीता– ११ ईतर वाहनांवरती – ८६ केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आह

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.